राज्यातील विमानतळांच्या शिर्डी, रत्नागिरी, आर.सी.एस. योजनेंतर्गत विमानतळे, नांदेड, लातूर विकासाकरीता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. बियुडी १६२६/६१८/प्र.क्र.१२०/विमान-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दि.०६ नोव्हेंबर, २०२६.

वाचा :

१. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.०९.०४.२०२६
२. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांचे पत्र क्र.मविविकं/२०२६/वित्त व लेखा/५३७, दि.०९.०६.२०२६ व पत्र क्र. No.MADC/VCMD/०५१, दि.७.०९.२०२६

प्रस्तावना :-

राज्यातील विमानतळांच्या विकासासाठी लेखाशिर्ष ३०५३ ०१६४ खाली निधी उपलब्ध करून देण्यात येतो. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता सदर लेखाशिर्षाखाली रु.१३००.०० कोटी (रू. तेराशे कोटी फक्त) इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने वाचा येथील क्र. २ च्या पत्रान्वये शिर्डी विमानतळ, आर.सी.एस योजना, रत्नागिरी विमानतळ, नांदेड विमानतळ, लातूर विमानतळ, आणि कराड विमानतळ विकासासाठी कामे करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे. सदर विमानतळाकरीता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यातील शिर्डी विमानतळ, RCS योजनेअंतर्गत विमानतळे, रत्नागिरी विमानतळ, नांदेड विमानतळ आणि लातूर विमानतळ विकासाकरीता एकुण रु.८५.९२ कोटी (रू. पंच्याऐंशी कोटी ब्यान्नव लक्ष फक्त) इतका निधी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस खालील तक्त्यामधील स्तंभ २ मधील विमानतळास स्तंभ ३ मध्ये नमूद केलेला निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	विमानतळाचे नाव	निधी (रूपये कोटीत)
१	**२**	**३**
१	शिर्डी विमानतळ	रू. ३४.९५
२	RCS योजनेअंतर्गत विमानतळे	रू.३२.००
३	रत्नागिरी विमानतळ	रू.१०.६७

४	नांदेड विमानतळ	रू.४.१५
५	लातूर विमानतळ	रू.४.१५
	एकूण	**रू.८५.९२**

३. उपरोक्त खर्च " मागणी क्रमांक ए-७, ३०५३ नागरी विमानचालन, ०२ विमानतळ, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका, (००) (०२) विमानतळाच्या विकासाकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस सहायक अनुदान (कार्यक्रम), (३०५३ ०१६४) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर), " या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. बिम्स प्रणालीवर निधी वितरणासाठी सह सचिव / उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (विमानचालन, मंत्रालय, मुंबई (A००३६)) हे नियंत्रक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. सबब, सदर निधी बिम्स प्रणालीवर सह सचिव/उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (विमानचालन), मंत्रालय, मुंबई यांना वितरीत करण्यात यावा. संचालनालय स्तरावर देयके अदा करण्यासाठी उपसंचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. वितरीत करण्यात येत असलेला सदरहू निधी सशर्त असून ज्या विकासकामांसाठी वितरीत करण्यात आला आहे, त्याच कामांसाठी तो दि.३१ मार्च २०२७ पूर्वी खर्ची पडेल याची खबरदारी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने घ्यावी. तसेच, वितरीत निधी PLA अथवा बँक खात्यात जमा न करता विहीत प्रयोजनातूनच खर्च होण्याची खातरजमा कंपनीने करावी व खर्च करण्यात आलेल्या निधीबाबत वेळोवेळी आढावा घेऊन विहीत कालावधीत खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास तसेच महालेखापाल कार्यालयास सादर करावे.

६. अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध करून दिलेला निधी कोषागारातून आहरीत करण्यापूर्वी तसेच, खर्च करताना राज्य शासनाची कार्यनियमावली, वित्तीय नियमावली, अर्थसंकल्पीय नियम पुस्तिकेतील तरतुदी तसेच, वित्त विभागाचे, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.०९.०४.२०२६ मधील मार्गदर्शक सूचना व वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.अनौ.सं.क्र. ६१७/व्यय-४, दि.२२.१०.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६११०६१८१०५९८५०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Digitally signed by SARIKA ASHISH GANVIR
Date: 2026.11.06 18:11:51 +05'30'

(सारिका मेंढे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या., मुंबई
२. संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई.
३. उपसंचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई.
४. महालेखापाल, (लेखा परिक्षा)/ (लेखा अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परीक्षक, मुंबई.
७. कक्ष अधिकारी, कार्या-१४४३, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. कक्ष अधिकारी, कार्या-व्यय ४, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. कक्ष अधिकारी, कार्या-२५/ अर्थसंकल्प, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.निवडनस्ती